डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समितीस सन २०१७-२०१८ मधील निधी उपलब्ध करुन देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन ज्ञापन क्रमांकः संकीर्ण-११११/(प्र.क्र.१५१/१६)/समन्वय
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २३ मार्च, २०१८.

वाचा- १. शासन निर्णय क्र.डिबीए-२००८/(८६/०८)/समन्वय दि.३०.९.२००८
२. शासन निर्णय क्र.डिबीए-२००८/(८६/०८)/समन्वय दि.१८.११.२००९
३. शासन निर्णय क्र. समिती-२५११/(प्र.क्र.१५५/१३)/समन्वय, दि.३०.७.२०१४
४. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.उशिसं- खंड प्रकाशन -२२/खर्च /२०१७-१८/प्रशा-३/३४८२, दि.१२/०३/२०१८.

प्रस्तावना :-

डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा जोतीराव फुले, राजर्षी शाहू यांचे साहित्य प्रकाशित करण्यासाठी उपरोक्त संदर्भाधिन अ. क्र.१ च्या शासन निर्णयान्वये तीन वेगवेगळया समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. संदर्भाधिन अ. क्र.२ च्या शासन निर्णयान्वये या महापुरुषांच्या साहित्याचा शोध घेणे, आवश्यक वाटल्यास राज्यात/ राज्याबाहेर दौरे करणे, साहित्याची तपासणी करणे, साहित्याची विगतवारी व संशोधनात्मक प्रक्रिया करणे, साहित्याचे मुद्रण व पुनर्मुद्रण करणे व आवृत्ती काढण्यास मान्यता देण्यात आली आहे. संदर्भाधिन अ.क्र.३ च्या शासन निर्णयान्वये सदर समित्यांना दि. २३.११.२०१६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. पुढील मुदतवाढीच्या प्रस्तावास मा. मुख्यमंत्री यांनी मान्यता दिली आहे. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी संदर्भाधिन अ. क्र.४ च्या पत्रान्वये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या खंड क्र.२२ फोटोबायोग्राफी या खंडाचा प्रकाशन समारंभ दि.१४/०४/२०१० रोजी करण्यात आला आहे. या खंडाच्या प्रकाशन समारंभासाठी रु.४,३८,६५८/- इतका खर्च करण्यात आला आहे. त्या खर्चास दि.२४ मार्च, २०१७ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. त्यानुसार दि.३०/०३/२०१७ रोजी आदेश पारित करुन, देयक कोषागारास सादर केले असता, त्यास काही आक्षेप लावल्यामुळे सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात खर्च होऊ शकला नाही म्हणून सदर देयकाच्या रु.४,३८,६५८/- (रुपये चार लाख अडतीस हजार सहाशे अठ्ठावन्न फक्त) इतक्या खर्चाची देयके सन २०१७-१८ च्या तरतूदीतून भागविण्यास मान्यता मिळावी अशी विनंती केली आहे. सदर खर्चास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

ज्ञापन :-

अधिदान व लेखाधिकारी यांना कळविण्यात येते की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे खालील नमूद केलेले ग्रंथ छपाईसाठी झालेला खर्च रु.४,३८,६५८/- (रुपये चार

लाख अडतीस हजार सहाशे अठ्ठावन्न फक्त) इतक्या खर्चास शासन मंजूरी देण्यात येत आहे. :-

अ.क्र.	तपशिल	रुपये
१.	डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ग्रंथ क्र.२२ फोटोबायोग्राफी या खंडाचा प्रकाशन सोहळा दि.१४/०४/२०१० रोजी करण्यात आला आहे. सदर देयकाचा खर्च भागविणेबाबत.	४,३८,६५८/-

२. सदर खर्च मागणी क्र. २२०५ कला व संस्कृती, ८०० इतर खर्च, (०१) समिती व समारंभ (०१) (०३) थोर राष्ट्रीय पुरुषांच्या साहित्याचे प्रकाशन (२२०५ ३१४३) या लेखाशीर्षाखाली सन २०१७-१८ च्या मंजूर रु.८०० लक्ष तरतूदीतून खालील तकत्यातील स्तंभ - ७ मध्ये दर्शविल्याप्रमाणे रु.४,३८,६५८/- (रुपये चार लाख अडतीस हजार सहाशे अठ्ठावन्न फक्त) इतका निधी खर्च करण्यात यावा. :- **(रुपये हजारात)**

अ. क्र.	लेखाशिर्ष	उद्दिष्ट	अर्थसंकल्पित तरतूद	वितरीत केलेला निधी	शिल्लक निधी	वितरीत करावयाचा निधी
१	२	३	४	५	६	७
१	मागणी क्रमांक: डब्ल्यू-४, २२०५, कला व संस्कृती, ८०० इतर खर्च, (०१) समित्या व समारंभ, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (०१) (०३) थोर राष्ट्रीय पुरुषांच्या साहित्याचे प्रकाशन (२२०५३१४३).	०६-दूरध्वनी, वीज व पाणी	३००	१००	२००	०
२		१०-कंत्राटी सेवा	२००	१००	१००	०
३		११-देशांतर्गत प्रवास खर्च	८००	२५१	५४९	०
४		१३-कार्यालयीन खर्च	५५००	२५००	३०००	०
५		१६-प्रकाशने	७००००	४१३४०.५९	२८६५९.४१	४३८.६५८
६		२८-व्यावसायिक-सेवा	२००	००१	१९९	०
७		५२-यंत्रसामुग्री व साधनसामुग्री	३०००	१००	२९००	०
		एकूण	८००००	**४४३९२.५९**	**३५६०७.४१**	**४३८.६५८**

३. उपरोक्त खर्च करण्यास संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे. सदर मंजूरी शासनाने ठरवून दिलेल्या प्रचलित कार्यपध्दती व नियमानुसार कार्यवाही करण्याच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

४. सदर ज्ञापन वित्त विभाग शासन निर्णय क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम भाग-२, दि.१७.४.२०१५ चे वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग पहिला, उपविभाग तीन मधील अनुक्रमांक ३, परिच्छेद क्र.१६६ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत असून या शासन निर्णयातील तरतूदींचे काटेकोर पालन करण्यात यावे.

५. सदर शासन ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१८०३२६१६३५०२९८०८ असा आहे. हे ज्ञापन डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Siddharth Kharat

Digitally signed by Siddharth Kharat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6f8cb55012423727bece629d954713c1ec2962a9ca9b909643170e56321cfd24, cn=Siddharth Kharat
Date: 2018.03.26 16:38:38 +05'30'

(सिध्दार्थ खरात)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.मंत्री (उ. व तं. शि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा.राज्यमंत्री (उ. व तं. शि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा.विरोधीपक्ष नेता (विधानसभा/विधानपरिषद) यांचे स्वीय सहायक, विधानमंडळ, मुंबई.
४) अप्पर मुख्य सचिव (उ. व तं. शि. विभाग) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
५) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग (कार्यासन विघयो), मंत्रालय, मुंबई.
६) वित्त विभाग (व्यय- ५, अर्थ- ८), मंत्रालय, मुंबई.
७) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
८) सह संचालक, (उच्च शिक्षण) शिक्षण संचालनालय, मुंबई.
९) महालेखापाल (लेखा परिक्षा /लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र -I, मुंबई.
१०) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
११) अधिदान व लेखाअधिकारी, मुंबई.
१२) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१३) जिल्हा कोषागार अधिकारी, मुंबई.
१४) सदस्य-सचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती, मुंबई.
१५) कक्ष अधिकारी (साशि-१) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१६) निवड नस्ती (समन्वय).